**ठळक बातम्या**

- नवे फौजदारी कायदे भारतियांना वसाहतवादाच्या मानसिक गुलामगिरीतून मुक्त करतील, असा प्रधानमंत्र्यांचा विश्वास
- दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठीचे राष्ट्रीय पुरस्कार राष्ट्रपतींच्या हस्ते प्रदान /महाराष्ट्रातले प्रियांका दाभाडे, कनिका अग्रवाल, प्रथमेश सिन्हा, आणि सेंट झेवियर्स महाविद्यालय पुरस्कारनं सन्मानित
- दिव्यांगजनाच्या समावेशनासाठी सुरु केलेल्या सुगम्य भारत अभियानाला ९ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त देशभरात विविध कार्यक्रम
- तेलक्षेत्र नियमन आणि विकास सुधारणा विधेयक राज्यसभेत मंजूर

  **आणि**
- जम्मू-काश्मीरमध्ये दाचिगाम जंगलात झालेल्या चकमकीत कुख्यात दहशतवादी जुनैद अहमद भट ठार

**<><><><><>**

नव्या फौजदारी कायद्यांची अंमलबजावणी हे देशातल्या नागरिकांसाठी राज्यघटनेत अनुस्यूत असलेल्या आदर्शांची पूर्ती करण्याच्या दिशेनं टाकलेलं ठोस पाऊल आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज हरियाणात चंडीगढ इथं नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीचं लोकार्पण केल्यानंतर बोलत होते. नवे फौजदारी कायदे वसाहतवादाच्या मानसिक गुलामगिरीतून भारतीयांना मुक्त करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या कायद्यांच्या यशस्वी अंमलबजावणी निमित्त त्यांनी नागरिकांचं अभिनंदन केलं. या कार्यात योगदान देणाऱ्या सर्व व्यक्ति आणि संस्थांचे त्यांनी आभार मानले. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह ही यावेळी उपस्थित होते. येत्या तीन वर्षात हे तीन नवे कायदे संपूर्ण देशात लागू केले जातील, असं त्यांनी यावेळी सांगितलं.

त्यापूर्वी मोदी आणि शाह यांनी नव्या फौजदारी कायद्यांच्या यशस्वी अंमलबजावणीतील प्रगतीबद्दलचं सादरीकरण पाहिलं. भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष्य अधिनियम या तीन नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीला यावर्षी १ जुलैपासून सुरूवात करण्यात आली.

**<><><><><>**

दिव्यांग जनांचा सार्वजनिक वावर सोयीचा व्हावा तसंच, त्यांना समान वागणूक दिली जावी हे सर्वांचं कर्तव्य आहे, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. आंतरराष्ट्रीय दिव्यांगजन दिनानिमित्त नवी दिल्ली इथं आयोजित दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठीचे राष्ट्रीय पुरस्कार प्रदान केल्यानंतर त्या बोलत होत्या. दिव्यांगांना कोणत्याही अडथळ्याशिवाय जगता येणं हा समाजासाठी प्राधान्यक्रम असायला हवा. ज्या समाजात दिव्यांगाना समान संधी आणि वागणूक मिळेल तोच समाज प्रगत समाज असतो. याच उद्दिष्टानं सुगम्य भारत या अभियानाची वाटचाल सुरू आहे, असं राष्ट्रपती यावेळी म्हणाल्या....

**होल्ड - बाईट - राष्ट्रपती**

आंतरराष्ट्रीय दिव्यांग व्यक्ती दिनानिमित्त आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी एकूण २२ व्यक्ती आणि ११ संस्थांना राष्ट्रीय पुरस्कार देण्यात आले. या पुरस्कार विजेत्यांमध्ये महाराष्ट्रातल्या प्रियांका दाभाडे, कनिका अग्रवाल, प्रथमेश सिन्हा या तिघांचा तसंच सेंट झेवियर्स महाविद्यालयाचा समावेश आहे.

**<><><><><>**

दिव्यांग व्यक्तींसाठी सर्वसमावेशक वातावरण असलेला भारत निर्माण करण्याच्या उद्देशानं सुरू झालेल्या सुगम्य भारत अभियानाचा आज नववा वर्धापन दिन आहे. पायाभूत सुविधा, वाहतुकीच्या सोयी आणि सार्वजनिक जागांचा वापर

दिव्यांगांना अधिक चांगल्या प्रकारे करता यावा यासाठी हे अभियान सुरू करण्यात आलं. तसंच दिव्यांगांचे हक्क आणि त्यांच्या गरजांविषयी जागरुकता निर्माण करण्यासाठीही हे अभियान सुरू करण्यात आलं. गेल्या ९ वर्षांत या अभियानानं आपल्या उद्दिष्टाचे अनेक महत्त्वपूर्ण टप्पे गाठले आहेत. सरकारी इमारती तसंच वाहतूक सुविधांची पुनर्रचना करण्यापासून ते सांकेतिक भाषा प्रशिक्षण कार्यक्रम, विमानतळावरचे रॅम्प, शौचालयांची पुनर्रचना, रेल्वे आणि बस स्थानकांमध्ये दिव्यांगासाठी विशेष रॅम्प अशा सोयींचा त्यात समावेश आहे.

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय दिव्यांग दिन २०२४ चं औचित्य साधून सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्री डॉ. वीरेंद्र कुमार यांनी दिव्यांगजनांच्या सक्षमीकरणासाठी आज नवी दिल्लीत १६ उपक्रमांचा प्रारंभ केला. त्यात सुगम्य भारत अभियान आणि ब्रेल बुक पोर्टल यासारख्या अनेक उपक्रमांचा समावेश आहे.

**<><><><><>**

तेलक्षेत्र नियमन आणि विकास सुधारणा विधेयक २०२४ ला आज राज्यसभेत मंजुरी देण्यात आली. या विधेयका अंतर्गत तेलक्षेत्र नियमन आणि सुधरणा विधेयक १९४८ मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. सुधारित कायद्यामध्ये खनिज तेलाची व्याप्ती वाढणार आहे.

धोरणात स्थैर्य, विवादांचं सुलभ निराकरण या विधेयकामुळे सोपं होईल, तसंच तेल आणि वायू क्षेत्रात व्यवसाय करणं सुलभ होईल, असं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी सांगितलं. मागच्या तीन वर्षात तेलांच्या किमती कमी झाल्याचंही सिंग यांनी सांगितलं.

**<><><><><>**

हिवाळी अधिवेशनात पहिल्या पाच दिवसांत संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज गदरोळात बंद पडल्यानंतर आज सहाव्या दिवशी प्रश्नोत्तरांचा तास आणि शून्य प्रहरा सार्वजनिक हिताच्या अनेक मुद्यांवर चर्चा झाली.

**मनरेगा** अर्थात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या निधीत गेल्या दहा वर्षांत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. चालू आर्थिक वर्षात सरकारनं मनरेगासाठी अर्थसंकल्पात ८७ हजार कोटी रुपयांची तरतूद केली, अशी माहिती ग्रामविकास राज्यमंत्री डॉक्टर चंद्रशेखर पेम्मसानी यांनी लोकसभेत एका लेखी प्रश्नाला उत्तर देताना दिली.

शेतमालाच्या **हमीभावात** तिप्पट वाढ करण्यात आल्याचं केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज लोकसभेत एका पुरवणी प्रश्नाला  उत्तर देताना सांगितलं.

सरकार देशातली प्राथमिक **आरोग्य** सुविधा बळकट करण्याचा सातत्याने प्रयत्न करत आहे, असं केंद्रीय आरोग्य मंत्री जे पी नड्डा यांनी आज राज्यसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं.

केप ऑफ गूड होप या दूरच्या प्रवास मार्गामुळे भारताच्या  निर्यातीवर परिणाम झाल्याचं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग  मंत्री पीयूष गोयल यांनी आज लोकसभेत लेखी उत्तरात सांगितलं.

**<><><><><>**

बँकिंग कायदे सुधारणा विधेयक २०२४ पारीत करण्यासंदर्भात लोकसभेत आज चर्चा करण्यात आली. या विधेयकानुसार नॉमिनीजची संख्या चारपर्यंत वाढवण्यात येणार आहे. या विधेयकानुसार बँकांना त्यांच्या लेखापरीक्षकांचे मानधन ठरवण्याचा अधिकारही देण्यात येणार आहे.

या सुधारणांमुळे बँक प्रशासनात अधिक बळकटी येणार असून ग्राहकांना चांगल्या सुविधांचा लाभ होईल, असं अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सांगितलं.

तर  बँकिंग कायद्यांकडे वेगळं न पाहता देशाच्या एकूण आर्थिक स्थितीसह त्याचा विचार करायला हवा असं काँग्रेस खासदार गौरव गोगोई म्हणाले.

**<><><><><>**

भारतीय वायुयान विधेयक २०२४  वर आज राज्यसभेत चर्चा करण्यात आली. हे विधेयक पावसाळी अधिवेशनात मंजूर करण्यात आलं होतं. या विधेयकामुळे नागरी विमान वाहूतक उद्योगाला आरेखन, उत्पादन आणि देखभाल यासाठी  मदत होणार असल्याचं नागरी विमान वाहतूक मंत्री के राममोहन नायडू यांनी सांगितलं.

**<><><><><>**

कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय, तसंच केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्थेच्या सर्व शाखांनी शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी काम करावं, असं आवाहन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केलं आहे. केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्थेच्या शतकमहोत्सवी कार्यक्रमात ते बोलत होते. या संस्थेच्या शतकमहोत्सवी स्तंभाचं उद्घाटन, तसंच संस्थेनं विकसित केलेली दोन नवी

तंत्रज्ञानं आणि संस्थेच्या कामाशी संबंधित तीन पुस्तकांचं प्रकाशनही उपराष्ट्रपतींच्या हस्ते झालं. केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान, या खात्याचे राज्यमंत्री रामनाथ ठाकुर, महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, संस्थेचे पदाधिकारी आणि इतर यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

झारखंडमध्ये, हेमंत सोरेन सरकारच्या मंत्रिमंडळाचा शपथविधी येत्या गुरुवारी म्हणजेच ५ डिसेंबरला होणार आहे. राज्यपाल संतोष कुमार गंगवार राजभवनात मंत्र्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ देतील.

झारखंड मुक्ती मोर्चाच्या नेतृत्वाखालील आघाडी सरकारचे ११ मंत्री शपथ घेण्याची शक्यता आहे. झारखंड मुक्ती मोर्चाच्या ६ मंत्र्यांचा, काँग्रेसच्या ४ मंत्र्यांचा, तर राष्ट्रीय जनता दलाच्या एका मंत्र्यांचा, सोरेन यांच्या मंत्रिमंडळात समावेश होईल. हेमंत सोरेन यांनी २८ नोव्हेंबर रोजी झारखंडचे १४ वे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली होती.

**<><><><><>**

जम्मू आणि काश्मीरमध्ये श्रीनगर इथल्या दाचिगाम जंगलात झालेल्या चकमकीत जुनैद अहमद भट हा कुख्यात दहशतवादी ठार झाला. दाचिगाम भागात दहशतवादी लपून बसल्याची माहिती मिळाल्यानंतर काल मध्यरात्री शोध मोहीम राबवली. त्यावेळी सुरक्षा दलांचा सुगावा लागलेल्या दहशतवाद्यांनी गोळीबार सुरू केला. त्याला भारतीय सुरक्षा दलांनी प्रत्युत्तर दिलं. भट हा लष्कर ए तोयबा या दहशतवादी संघटनेचा कमांडर असून २० ऑक्टोबर रोजी गंदरबल जिल्ह्यात बोगदा बांधकामाजवळ झालेल्या स्फोटात त्याचा सहभाग होता, अशी माहिती पोलिसांच्या अधिकृत सूत्रांनी दिली आहे.

**<><><><><>**

भारतरत्न डाॅ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दादर इथं ६ डिसेंबर रोजी होणाऱ्या महापरिनिर्वाण दिनाच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी विशेष बैठक आज झाली. देशभरातून येणाऱ्या अनुयायांच्या सोयीसाठी चैत्यभूमीवर करण्यात आलेल्या सोयी-सुविधांचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आढावा घेतला.